# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

## मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली. ता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र./मसंकें/प्रअवा/५८३/२०२२.  दिनांक 22 FEB 2022

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग प्रक्षेत्र नर्सरीत जांभूळ ८००० नग, करवंद ५००० नग, फणस ६००० नग, आणि कोकम १००० नग अशी एकूण २०,००० नग कलमे बांधणे व बांधलेल्या कलमांचे २५/०३/२०२२ पर्यंत संगोपण करणे हे प्रस्तावित आहे. सदर फणस,जांभूळ,कोकम आणि करवंद रोपांवर कलमे बांधणे व त्याअनुषंगाने करावयाची इतर कामे याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | आवश्यक परिमाण व मजुर युनिट |
|---|---|---|
| १) | फणस रोपे ६,००० नग, जांभुळ रोपे ८,००० नग, करवंद रोपे ५,००० नग, कोकम रोपे १,००० नग अशी एकूण २०,००० नग रोपे शेडमध्ये लावून घेणे. सदर रोपांमधील गवत काढणे, रोपांना पॉटिंग मिश्रण टाकणे, इत्यादी कामे करणे. | ९० युनिट |
| २) | फणस, जांभुळ, कोकम, करवंद अंकुर काडया काढणे | २०,००० नग |
| ३) | फणस, जांभुळ, कोकम, करवंद कलमे बांधणे | २०,००० नग |
| ४) | बांधलेल्या फणस, जांभुळ, कोकम, करवंद कलमांना पाणी घालणे, फुट काढणे, पिशवीतील गवत काढणे, कलमांवर रोग व किड येवु नये म्हणून फवारणी काम करणे, सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करणे सदर काम हे २५/०३/२०२२ पर्यंत करणे. | ८५ युनिट |

उपरोक्त प्रमाणे कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमतीपत्र आणि दरपत्रक नमुना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये होणा-या मजूरीच्या एकुण रकमेचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमुना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक ः ०७/०३/२०२२ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"वाकवली विभाग प्रक्षेत्रामध्ये फणस,जांभूळ,कोकम आणि करवंद कलमे बांधणे व त्याअनुषंगाने इतर कामे ठेका पध्दतीने करणे"** असा स्पष्ट उल्लेख करावा, लिफाफा बंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

- उपरोक्त कामाच्या अटी व शर्ती:—

१ ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहूनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

(PTO)

२ ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे ज्याचे दरपत्रक कमी आहे त्या ठेकेदाराला कामाची ऑर्डर दिल्यानंतर त्याने अनामत रक्कम म्हणून रू.५000/- (रू.पाच हजार मात्र) धनाकर्षाद्वारे (D.D.) भरावी लागणार आहे. धनाकर्ष हा डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली" या नांवे 'आरडीसीसी बँक शाखा वाकवली येथे देय' काढावा.दरपत्रकासोबत पॅनकार्ड ची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

३ फणस,जांभूळ,कोकम,आणि करवंद वडस्टॉक या प्रक्षेत्राच्या झाडांवरून स्वत काढून कलमे बांधुन बांधलेल्या कलमांचे २५ मार्च २०२२ पर्यंत संगोपण करणे.

४ कलमे बांधणीच्या बिलाचा पहीला हप्ता फणस रोपे ६,००० नग, जांभूळ रोपे ८,००० नग, करवंद रोपे ५,००० नग, कोकम रोपे १,००० नग अशी एकूण २०,००० नग रोपे शेडमध्ये लावून घेणे, रोपांमधील गवत काढणे, पॉटिंग मिश्रण टाकणे इत्यादी कामे करणे, फणस, जांभुळ, कोकम, करवंद अंकूर काड्या २०,००० नग काढणे, फणस, जांभुळ, कोकम, करवंद कलमे २०,००० नग कलमे बांधणे ही कामे पूर्ण झाल्यानंतर अंदाज पत्रकातील दरानुसार अदा करणेत येईल.

५ फणस,जांभूळ,कोकम,आणि करवंद कलमे ठेका अंतर्गत बिलाचा दुसरा हप्ता बांधलेल्या फणस, जांभुळ, कोकम, करवंद कलमांना पाणी घालणे, फुट काढणे, पिशवीतील गवत काढणे, आवा कलमांवर रोग व किड येवु नये म्हणुन फवारणी काम करणे, सुक्ष्म अन्नद्रव्याची फवारणी करणे इत्यादी कामे केल्यानंतर आदा करणेत येईल.

६ फणस, जांभुळ, कोकम, करवंद कलमे जगण्याचे प्रमाण ६० % गृहीत धरूनच आपणास निविष्ठा पुरविण्यात येतील कलमे यशस्वी होण्याचे प्रमाण ६० %पेक्षा कमी आल्यास कमी असलेल्या कलमांची वसुली प्रती कलम रू.२.५० पै.प्रती नग याप्रमाणे अंतिम बिलामधून अथवा अनामत रक्कमेतून वसूल करणेत येईल.तसेच कलमे जर का ६०% पेक्षा जास्त फुटली तर त्याप्रमाणे मंजूरी घेवून ठेकेदारास अदायगी केली जाईल.

७ प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल. पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधिताकडे जमा करावयाचे आहे.

८ ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राह्य धरले जाणार नाही. कलमांबाबत दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत रद्द केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

९ ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बँक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्याचे बँक खाती N.E.F.T./R.T.G.S. धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.

१० ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्या संबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

११ ठेक्याच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूराकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान/चोरी झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत वसुल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल व त्याबाबतच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.

१२ ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास

बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

१३सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांकSLP-5443/90 नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजुरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१४ ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात रु.१००/- च्या बॉंड पेपरवर करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१५. प्रचलित पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत माहितीसाठी सादर...

१ नोटिस बोर्ड मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
२ नोटिस बोर्ड भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.
३ ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे,ता.दापोली/खेड